**“एप्रिल २०१९” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ८ एप्रिल २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेव्दारे शासन सेवेत गट-अ व गट-ब मध्ये नियुक्त होणाऱ्या परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०१९ च्या शासन शुद्धीपत्रान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.१ ते ३ नुसार सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व अधिनस्त कार्यालयातील प्रशासकीय विभाग प्रमुख, विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या यादीत विभागीय आयुक्त यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व सहायक आयुक्त (मावक) व सह/उपसचिव (मावक), सामान्य प्रशासन विभाग यांना अनुक्रमे विभाग प्रमुख व प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून समावेश करण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०१९ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेला सन २०१९-२० करिता रु.४.०० कोटी इतक्या योजनेतर मंजूर खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१९ या चार महिन्यांकरिता रु.२.०० कोटी इतके प्रशिक्षण शुल्कापोटीचे सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०१९ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर, उत्तर पैठण, औरंगाबाद या संस्थेला सन २०१९-२० करिता रु.१.४४ कोटी इतक्या योजनेतर मंजूर खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१९ या चार महिन्यांकरिता रु.७२.०० लाख इतके प्रशिक्षण शुल्कापोटीचे अनिवार्य सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०१९ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला सन २०१९-२० करिता रु.१.४४ कोटी इतक्या योजनेतर मंजूर खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१९ या चार महिन्यांकरिता रु.७२.०० लाख इतके प्रशिक्षण शुल्कापोटीचे अनिवार्य सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०१९ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४अ अंतर्गत कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील ७ उमेदवारांच्या खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कालावधीकरिता दिनांक २२ एप्रिल २०१९ पासून मंत्रालयीन विभागात नियुक्ती करण्यात आली आहे.

## (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील ६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका लिपिक-टंकलेखकाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

## (ग) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- २ उच्चश्रेणी लघुलेखकांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

## (च) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.

**(छ) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक २५ एप्रिल २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक यांची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८-२०१९ ही दिनांक १६ मे २०१९ रोजी सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

**(ज) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ४ एप्रिल २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या १४२८ मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

* * * * * *